आतील पानात वाचा
- पुत्र व्हावा ऐसा,बाप जैसा बेटा..!!
- नगर–मनमाड महामार्ग विकासकामांसाठी ४.६८ कोटींचा निधी...
- घराणेशाहीला हटवूया, लोकशाहीला नटवूया...

दैनिक
# अक्षराज
अचूक वेध,अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

**आजचा सुविचार**

धर्म म्हणजे मानवी अंत:करणाच्या विकासाचे फळ आहे. यास्तव धर्माचा प्रमाणभूत आधार पुस्तक नसून मानवी अंत:करण आहे.
– स्वामी विवेकानंद

वर्ष : ०५ | अंक : ८७, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.१० नोव्हेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# ५६ जणांना घेऊन जाणारी स्कुल बस १५० फूट खोल दरीत कोसळली !

## दोन चिमुकल्यांचा मृत्यू, १८ जखमी, पालकांचा आक्रोश

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, नंदुरबार :** आश्रम शाळेला सुट्टी लागल्याने गावाकडे आलेल्या विद्यार्थ्यांना शाळेत घेऊन जात असलेल्या खाजगी बस मोलगी अक्कलकुवा दरम्यान असलेल्या आम लीबारी जवळ घाटातील दरीत १५० फूट कोसळून भीषण अपघात घडला. या अपघातात दोन विद्यार्थ्यांचा जागीच मृत्यू झाला. तर १८ जण जखमी आहेत. पैकी दोन जणांची प्रकृती चिंताजनक आहे. या बसमध्ये ५६ प्रवासी असल्याची माहिती मिळाली आहे.या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली.

चाळीसगाव तालुक्यातील मेहुणबारे येथील अनुदानित आदिवासी आश्रम शाळेत अक्कलकुवा तालुक्यातील म ोलगी परिसरातील विविध गावातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. दिवाळीची सुट्टी असल्याने विद्यार्थी गावाकडे आले होते. सुट्टी संपल्याने अतिदुर्गम भागातील सातपूडा परिसरातील आदिवासी विद्यार्थ्यांना घेऊन जाणारी खाजगी स्कूल बस (क्र.एम. एच. १५, ए.के, १४५९) ही मोलगी अक्कलकुवा दरम्यान आमलीबारी जवळ असलेल्या घाटातील दरीत १५० फूट खोल दरीत कोसळल्याची घटना ९ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजे दरम्यान घडली.

यावेळी बसमध्ये विद्यार्थ्यांसह एक शिक्षक एक परिचर असे ५६ जण असल्याची माहिती सूत्रानुसार प्राप्त झाली आहे. जखमी विद्यार्थ्यांना तातडीने अक्कलकुवा येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. वैद्यकीय अधीक्षक डॉ. गणेश पवार आणि कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांवर



योग्य उपचार केले असता यापैकी १८ जखमी विद्यार्थ्यांना नंदुरबार येथील जिल्हा रुग्णालयात संदर्भ सेवेसाठी तातडीने रवाना करण्यात आले. या १८ पैकी दोन विद्यार्थी गंभीर जखमी असल्याचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. पवार यांनी सांगितले.

या अपघातात जगदीश बहादूसिंग वळवी (वय ७ वर्ष रा.निंबिपाडा) आणि कपिला जहांगिर राऊत ( वय १३ वर्ष, रा.काठी) हे दोन विद्यार्थी मृत्युमुखी पडले. यात जयश्री केशव वसावे, अत्तर सिंग मुंग्या वसावे, रिना अत्तेसिंग वसावे, अर्जून दिल्या वसावे, अनमोल राया वसावे, ऊर्मिला दिनेश तडवी, शिल्पा मंगलसिंग वळवी, आर्या सुरसिंग वळवी, अजित सागर वळवी, संदिप अभिजीत वळवी, अर्थव विलास तडवी, माया रोत्या वसावे, सोनी दिरवा वळवी, हिना बहादूरसिंग वळवी, रसिला बिलाड्या वसावे, सचिन रामसिंग चौधरी, यशवंता विलास वळवी, करिना सुऱ्या वळवी, संदिप बिज्या तडवी, रूषा वळवी हे विद्यार्थी जखमी झाले. विद्यार्थ्यांना नंदुरबार येथे संदर्भ सेवेसाठी तातडीने हलवण्यात आले यापैकी दोन विद्यार्थ्यांची स्थिती गंभीर आहे.

अपघाताचीमाहिती मिळताच घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी सुभाष भोये आपल्या फौजफाट्यासह पोहोचले. यावेळी जखमींचे बचाव कार्य करण्यासाठी भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष नागेश पाडवी, माजी जिल्हा परिषद सदस्य किरसिंग वसावे, प्रताप वसावे, नितेश वळवी, अनिल पाडवी, माजी जिल्हा परिषद सभापती शंकर पाडवी, रोहित चौधरी, रवी पाडवी, जयवंत पाडवी यांनी बचावकार्य केले. खाजगी वाहने आणि रूग्णवाहिकेने जखमींना अक्कलकुवा येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले.

अपघाताचीमाहिती मिळाल्यानंतर अक्कलकुवा ग्रामीण रुग्णालयात पालकांनी एकच गर्दी करून विद्यार्थ्यांच्या पालकांनी आक्रोश केला. घटना घडल्यानंतर लगेचच बस चालक तेथून फरार झाले. अद्याप त्यांना ताब्यात घेण्यात आलेले नाही. सातपुड्यातील शेकडो विद्यार्थ्यांना आमिष देऊन परजिल्ह्यातील संस्थाचालक खाजगी वाहनातून जनावरांचे कोंबून घेवून जात असल्याचे वेळोवेळी घडत आहे. याबाबत प्रशासनाने गांभीर्याने दखल न घेतल्याने आजचा हा अपघात होवून निष्पाप विद्यार्थ्यांचा बळी गेल्याचा आरोप पालकांनी केला आहे.

## आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे पडोलीवासियांची दीर्घकालीन मागणी पूर्ण

### स्मशानभूमीसाठी ५० लक्ष रुपयांचा निधी मंजूर

**अक्षराज : वसंत वडस्कर**



**दि.०९, चंद्रपूर :** जनतेला दिलेला शब्द पूर्ण करणारे राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या दृढ पाठपुराव्यामुळे मौजा पडोली येथील नागरिकांची दीर्घकालीन मागणी आता मार्गी लागली आहे. गावातील स्मशानभूमीच्या बांधकामासाठी तब्बल ₹ ५० लाखांचा निधी मंजूर करण्यात आला असून, या निर्णयामुळे ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे. या बांधकामामुळे स्मशानभूमीची पायाभूत सुविधा सुसज्ज होणार असून, अंतिम संस्काराची प्रक्रिया सन्मानपूर्वक व सुलभ पद्धतीने होण्यास मदत होईल. नागरिकांच्या सांस्कृतिक व सामाजिक गरजांशी निगडित या महत्त्वाच्या सुविधेची उभारणी गावाच्या सर्वांगीण विकासासाठी एक मोलाचा टप्पा म्हणून पाहिली जात आहे. आ. सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे मौजा पडोलीचे सरपंच विक्की लाडसे आणि गावकऱ्यांनी स्मशानभूमी बांधकामासाठी मागणी केली होती. या मागणीची दखल घेत, आ. मुनगंटीवार यांनी यासंदर्भात सातत्याने पाठपुरावा करत स्मशानभूमीसाठी ₹ ५० लाखांचा निधी मिळवून दिला. जनतेच्या मागणीनुसार प्राधान्याने सुविधा उपलब्ध करून देणे हीच आ. मुनगंटीवार यांच्या विकासकामाची ओळख बनली आहे. या निधी मंजुरीनंतर पडोलीवासीयांनी आ. सुधीर मुनगंटीवार यांचे आभार मानले आहे. आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मंत्री असताना नेहमीच चंद्रपूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी भरीव निधी उपलब्ध करून दिला आहे. त्यांच्या पुढाकाराने सैनिकी स्कूल, मेडिकल कॉलेज, कॅन्सर हॉस्पिटल, बांबू संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र, वन अकादमी, रामसेतू, इंजिनिअरिंग कॉलेज आणि अनेक पायाभूत प्रकल्पांमुळे चंद्रपूर शहराचा चेहरा–मोहरा बदलला आहे.

## ठाकरे गटासाठी अत्यंत वाईट बातमी!

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, अहिल्यानगर :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांना कठीण काळात साथ देणाऱ्या नेत्यानेदेखील यावेळी पक्षाची साथ सोडली आहे. ठाकरे गटाचे माजी आमदार शंकरराव गडाख यांनी ठाकरे गटाला सोडचिठ्ठी दिली आहे. गेल्यावर्षी विधानसभा निवडणुकीत मशाल चिन्हावर त्यांनी निवडणूक लढवली होती.

पण त्यांचा पराभव झाला होता. विशेष म्हणजे महाविकास आघाडी सरकारच्या काळात शंकरराव गडाख हे राज्याचे मृदा आणि जलसंधारण विभागाचे मंत्री होते. ठाकरेंनी आपल्याला बोलावून घेत मंत्रिपदाची संधी दिली या विचाराने ते प्रभावित झाले होते. त्यामुळे त्यांनी शिवसेनेत फूट पडली तेव्हा उद्धव ठाकरेंची साथ सोडली नव्हती. याउलट त्यांनी नेवासामध्ये मेळावा घेत आपण उद्धव ठाकरेंच्यासोबत असल्याचं त्यांनी म्हटलं होतं. पण आता त्यांनी पक्षाला सोडचिठ्ठी दिली आहे.

त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. शिवसेना पक्ष फुटल्यानंतरही अखेरपर्यंत उद्धव ठाकरे यांच्या सोबत राहिलेले नेवासाचे माजी आमदार, म ाजी मंत्री शंकरराव गडाख यांनी आता पक्षाला सोडचिठ्ठी दिली आहे. त्यांनी पुन्हा एकदा आपल्या क्रांतिकारी शेतकरी पक्षाकडून स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका लढवण्याचे निश्चित केले आहे.

## कामावर जाताना टँकरची धडक, बुलढाण्याच्या खुशबूचा मुंबईत दुर्दैवी मृत्यू

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, बुलढाणा :** बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर शहरातील एका हुशार आणि प्रतिभावान युवतीचा म ुंबईत झालेल्या अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. खुशबू दीपक परयाणी (वय वर्ष २७) असं मृत युवतीचे नाव असून, ती आयसीआयसीआय बँकेच्या मुंबई शाखेत चार्टर्ड अकाउंटंट म्हणून कार्यरत होती.

६ नोव्हेंबरला बुलढाण्याची खुशबू आपल्या नेहमीच्या प्रमाणे कार्यालयात जात असताना, बीकेसी परिसरातील एशियन हार्ट हॉस्पिटल जंक्शनजवळ रस्ता ओलांडत असताना तिला भरधाव वेगाने येणाऱ्या पाण्याच्या टँकरने जोरदार धडक दिली. नेहमीच्या काम ाच्या लगबगिने खुशबू घराबाहेर पडली. पण, तिला क्षणाचीही कल्पना नसेल की ती तिच्यासोबत असं काही घडेल. कार्यालयात जात असताना, बीकेसी परिसरातील एशियन हार्ट हॉस्पिटल जंक्शनजवळ रस्ता ओलांडत असताना तिला भरधाव वेगाने येणाऱ्या पाण्याच्या टँकरने जोरदार धडक दिली. या धडकेत ती गंभीर जखमी झाली. सहकाऱ्यांनी तिला तातडीने रुग्णालयात दाखल केले, मात्र उपचारादरम्यान डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. विशेष म्हणजे, खुशबूचा विवाह १२ फेब्रुवारी रोजी होणार होता. भावी आयुष्याची सुंदर स्वप्नं रंगवत असतानाच नियतीने तिच्यावर काळाचा घाला घातला. या दुर्घटनेने मलकापूर शहरात शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.



खुशबू ही मलकापूर शहरातील प्रतिष्ठित समाजसेवक आणि व्यापारी ताराचंद परयाणी यांचे बंधू दीपक परयाणी यांची मुलगी होती. तिच्या निधनाने परयाणी कुटुंबासह परिचित आणि व्यावसायिक वर्तुळात दुःखाचे सावट पसरले आहे. तिच्या मागे आई–वडील भाऊ आणि काका असा परिवार सोडून ती निघून गेली.

**“कामाच्या लगबग आणि विचाराने अपघाताचे सत्र वाढते**

घरून निघाल्यानंतर वेळेवर कार्यालयात पोहोचणे व तिथे पोचल्यानंतर कामांमध्ये दररोज आपल्याला सिद्ध करणे या धावपळीत आपण क्षणभरचा रस्ता ओलांडताना किंवा वाहन चालवताना दुर्लक्ष करतो. अशामुळेच या घटनांना दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यामुळे आपल्या आयुष्य जीव हा महत्त्वाचा आहे. क्षणभर उशीर होऊ द्या, विचार करा, मग सर्व काही निर्णय घेत आपल्या कार्यालय आणि आपल्याला जे गाठायचे आहे तिथपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे.

## भाजपचं हिंदुत्व बेगडी, दाऊदवर गोमूत्र शिंपडून त्यालाही आपल्यात घेतील; उद्धव ठाकरेंची टीका

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, छत्रपती संभाजीनगर :** पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी हल्ला केला आणि अमित शहा यांच्या मुलामुळे भारतीय संघ पाकिस्तानबरोबर क्रिकेट खेळला. देशद्रोह्यांच्या साथीदारांच्या मांडीला मांडी लावून ते बसले. भारतीय जनता पक्षाचे हिंदुत्व बेगडी आहे. ते उद्या दाऊदवर गोमूत्र शिंपडून त्यालाही आपल्यात घेतील, अशी टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी शनिवारी केली.

या दौऱ्यात त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. सरकारने जाहीर केलेली मदत मिळाली, की नाही याची माहिती घेतली व सरकारवर आसूड ओढले. त्यांच्या दौऱ्याची सांगता शनिवारी (आठ नोव्हेंबर) झाली. या वेळी त्यांनी चिकलठाणा येथील गोशाळेत छत्रपती संभाजीनगर आणि जालना लोकसभा म




तदारसंघातील शिवसैनिकांची बैठक घेतली. त्या वेळी ते बोलत होते. पक्षाचे नेते व माजी खासदार चंद्रकांत खैरे, विधान परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, संपर्कप्रमुख विनोद घोसाळकर, ज्योती ठाकरे, माजी आमदार उदयसिंह राजपूत, सुभाष पाटील यांची या वेळी विशेष उपस्थिती होती. महानगरप्रमुख रेणुकादास (राजू) वैद्य यांनी बैठकीचे सूत्रसंचालन केले.

उद्धव ठाकरे म्हणाले, भाजप खरोखरच हिंदुत्ववादी असेल, तर त्यांनी आपल्या झेंड्यातून हिरवा रंग काढावा. भगवा एकच आहे आणि तो शिवरायांचा आहे. आपली ओळखदेखील भगवाच आहे. भाजपचे हिंदुत्व बेगडी आहे. त्यांच्या ढोंगाला तुम्ही बळी पडू नका.

भाजपवाले वंदे मातरम् म्हणू शकतात का, असा सवाल करून ते म्हणाले, भाजपवाले भारतमातेची लूट करीत आहेत. भाजप आणि त्यांच्या सरकारने केलेला भ्रष्टाचार नेमकेपणाने मांडा, आपण काय करणार आहोत ते देखील नेमकेपणाने लोकांना सांगा, असे शिवसैनिकांना सांगताना उद्धव ठाकरे म्हणाले, म हाविकास आघाडीचे सरकार होते तेव्हा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांचा देशात पहिला क्रमांक होता, आताचे मुख्यमंत्री दहाव्या क्रमांकावर आहेत.

**आयातींवर लक्ष देऊ नका !**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा संदर्भ देऊन, उद्धव ठाकरे स्थानिक नेते व कार्यकर्त्यांना उद्देशून म्हणाले, आता आयातींवर लक्ष देऊ नका. आपल्या शिवसैनिकांना संधी द्या. पाने झडली तरी नवीन कोंब फुटतात. सडलेली पाने झडलीच पाहिजेत.

आपली मुळे पक्की आहेत. तुम्ही महापालिका जिंकण्याचे वचन दिले आहे, ते पूर्ण करण्यासाठी उत्साह आणि आत्मविश्वास पाहिजे. राजकारण म्हणल्यावर येणे जाणे सुरूच राहणार.




## पारंपरिक लढती

हो-नाही करता करता दीर्घ प्रतीक्षेनंतर राज्यातील नगरपंचायतींच्या निवडणुकांचे बिगूल वाजल्याने कासावीस झालेल्या इच्छुकांसह सामान्य जनतेचाही जीव अखेर भांड्यात पडला. अनेकांनी तर स्वत:ला चिमटा काढून खरोखर रणधुमाळी सुरू झाली आहे ना, याची खात्री केली असणार! अर्थात, हे सरकार जिल्हा परिषदा आणि महापालिकांच्या उर्वरित निवडणुका जानेवारीअखेरपर्यंत खरोखरच घेईल का, याविषयी अनेकांच्या मनात अद्याप साशंकता आहेच.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन केल्याचे दर्शविण्यासाठी नगरपरिषदांच्या निवडणुका घेतल्या जातील आणि त्यानंतर काही कारण पुढे करीत न्यायालयाकडे धाव घेऊन दुसरा टप्पा एप्रिल-मेपर्यंत लांबणीवर टाकला जाईल, अशी एक अटकळ मंत्रालय ते मिनी मंत्रालयांत बांधली जात आहे. खरे-खोटे ठाऊक नाही; परंतु राज्य सरकारने शेतकरी कर्जमाफीची घोषणा करून त्यासाठी सचिवांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीला अहवाल सादर करण्यासाठी मार्चअखेरपर्यंत मुदत दिलेली आहे. म्हणजे त्यानंतर सरकारकडून कर्जमाफी योजनेची घोषणा केली जाऊ शकते. तसा शब्द नुकतेच आंदोलन करणाऱ्या बच्चू कडूंसह इतर शेतकरी नेते व विदर्भातील आंदोलकांना खुद्द मुख्यमंत्र्यांनी दिलेला असल्याने काही तरी हालचाल होईलच. श्रेयवादात किंवा 'मायलेज' लाटण्यात सरकारचा हातखंडा असल्याने या कर्जमाफीचा लाभ उपटण्यासाठी निवडणुकांचा दुसरा टप्पा लांबणीवर टाकला जाऊ शकतो, असा तर्क आहे. जो पूर्णत: अनाठायी म्हणता येत नाही. त्यामुळे नगरपालिकांप्रमाणे झेडपी आणि महापालिकांच्या रणसंग्रामाच्या तारखा जाहीर होतील, तेव्हाच राज्यातील जनतेचा त्यावर विश्वास बसू शकेल.

दुसऱ्या बाजूला न्यायव्यवस्थेवरील विश्वास अद्याप ढळला नसल्याने 'ऑल इज वेल' म्हणण्यासही जागा आहे. घोडामैदान जवळ असल्याने लवकरच 'दूध का दूध, पानी का पानी' होईल. तूर्त राज्यभरातील २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींत निवडणुका सुरळीत पार पडून किमान तीन ते आठ वर्षांनंतर तेथील प्रशासकीय राजवट संपुष्टात येणे, लोकशाही प्रक्रियेने निवडून आलेले जनप्रतिनिधी तेथे प्रवेशित होणे, हेही नसे थोडके! प्रशासकांच्या एकचालकानुवर्ती कारभाराला राज्य विटलेले आहेच. जनहिताच्या असंख्य कामांचा खोळंबा त्रासदायक ठरतो आहे. निवडून येण्याच्या उद्देशाने का होईना; पण लोकप्रतिनिधी लोकांची कामे करतात. किमान तसा देखावा तरी निर्माण करतात. असो. या संस्थांच्या तीन डिसेंबरच्या निकालानंतर महापालिका, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांचा बार उडवला जाईल, अशी आशा करूया. तीन-साडेतीन वर्षांत राज्यात बऱ्याच राजकीय उलथापालथी झाल्यानंतर पहिल्यांदाच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होऊ घातल्याने या निमित्ताने राजकीय पक्षांना स्वत:ची ताकद सिद्ध करता येईल, लोकांच्या मनात नेमके चाललेय तरी काय, याचा अंदाज बांधता येईल. या निवडणुका राज्याचे राजकारण व राजकीय पक्षांनाही आरसा दाखविणाऱ्या मानल्या जात असल्याने सत्ताधारी महायुती आणि विरोधी बाकावरील महाविकास आघाडी या दोहोंसाठी ही प्रतिष्ठेची लढाई म्हणावी लागेल. याशिवाय गावपातळीवरच्या कार्यकर्त्यांना अशा छोट्या सत्ताकेंद्रांवर वर्णीही लावता येईल. हे कार्यकर्ते लोकसभा वा विधानसभेच्या निवडणुका लढवू शकत नाहीत. सध्या प्रदेश व जिल्हा पातळीवर पक्षांतरे थांबल्याचे दिसत असले, तरी नगरपरिषदांमध्ये ती नव्याने सुरू झाली आहेत. परिणामी, कोण नेमका कोणत्या पक्षात आहे हे भल्याभल्यांना सांगता येणार नाही. काही वर्षांपर्यंत कॉंग्रेस-राष्ट्रवादीचा गड म्हणून मान्यता पावलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवर सत्ताधारी भाजप आणि शिंदे गटाने पक्षांतरे आणि तोडफोडीच्या राजकारणाने का होईना, तटबंदी मजबूत केलेली आहे. या घडामोडींना जनमानसातून कसा प्रतिसाद मिळतो, सत्ताधारी पक्षांची त्यांच्या मनात नेमकी काय प्रतिमा आहे, याचा अंदाज या निवडणुकांतून येऊ शकेल. महायुतीतील घटक पक्ष, गट-तट एकमेकांना साह्य करून सत्तेचा सोपान गाठतात की अंतर्गत धुसफुशीतून एकमेकांचा घात करतात, हे लवकरच उमजेल.

नाशिक जिल्ह्यात वरकरणी महायुती विरुद्ध महाविकास आघाडी आमनेसामने उभी ठाकणार असली, तरी पुन्हा एकदा पारंपरिक प्रतिस्पर्ध्यांतच रंगतदार लढती होतील, हे स्पष्टच दिसते. येवला, सिन्नर, मनमाड, त्र्यंबकेश्वरसह ११ नगरपरिषदांमध्ये 'इलेक्शन फीव्हर' चढू लागला आहे. जिल्ह्यात अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे सर्वाधिक सात आमदार आहेत, त्याखालोखाल भाजपचे पाच, शिंदे गटाचे दोन आणि एमआयएमचा एक आमदार आहे. या निवडणुकांत या लोकप्रतिनिधींसह जिल्ह्यातील मंत्र्यांची प्रतिष्ठा पणाला लागणार आहे.

# पुत्र व्हावा ऐसा, बाप जैसा बेटा..!!



मुलाचे पाय पाळण्यात दिसतात, असे म्हटले जाते. याचाच अर्थ मुलगा मोठा होऊन नेमका कुठला पराक्रम करणार किंवा पुढच्या आयुष्यात काय दिवे लावणार याचे संकेत त्याच्या लहानपणीच मिळू लागलेले असतात. किमान अशी उक्ती असली तरी मोठेपणी बहुतांश मुलांचे पाय हे आपल्या पित्याच्या पावलांवरच पडताना दिसतात. त्यामुळे जसा पिता, तसा पुत्र, असेही म्हटले जाते. यातून बाप मुलावर कसा प्रभाव टाकतो, हे प्रतीत होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्या कथित जमीन घोटाळ्यावरून तरी हेच म्हणावे लागेल. सध्या महाराष्ट्राच्या राजकारणात पवार पिता-पुत्र चांगलेच चर्चेत आहेत. एवढेच नाही, तर आपल्या पुत्राच्या पराक्रमामुळे अजित पवार राजकीयदृष्ट्या चांगलेच अडचणीतही आले आहेत. पार्थ पवार संचालक असलेल्या अमेडिया कंपनीने पुण्याच्या कोरेगाव पार्क परिसरात खरेदी केलेल्या जमिनीचे हे घोटाळा प्रकरण आहे. अमेडिया कंपनीने १ हजार ८०० कोटी रुपये बाजारमूल्य असलेली ४० एकर जमीन अवघ्या ३०० कोटी रुपयांना खरेदी केली. या जमीन खरेदीच्या व्यवहारावर २१ कोटी रुपयांचे मुद्रांक शुल्क कंपनीने भरणे अपेक्षित होते. परंतु मुद्रांक शुल्काची ही रक्कमही कंपनीला माफ करण्यात आली आणि अवघ्या ५०० रुपयांच्या मुद्रांक शुल्कावर जमिनीचा कायदेशीर व्यवहार करण्यात आला. या संपूर्ण जमीन व्यवहारात जागोजागी घोटाळाच घोटाळा झालेला दिसून येतो.

अमेडिया कंपनीने जी जमीन विकत घेतली ती महार वतनाची सरकारी जमीन आहे. ठराविक वर्गाला इनाम म्हणून मिळालेल्या या जमिनीची सहजासहजी खरेदी-विक्री करता येत नाही, त्यासाठी बऱ्याच अटी-शर्ती व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण कराव्या लागतात. अमेडिया कंपनीने या सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्या होत्या की नव्हत्या यावर असंख्य प्रश्न आता उपस्थित करण्यात येत आहेत. महाराष्ट्रात मुंबई-पुणे-नाशिक या तीन शहरांचा सुवर्ण त्रिकोण मानला जातो. ही तिन्ही शहरे एकमेकांशी रस्ते, रेल्वे आणि विमानसेवेने चांगल्या रितीने कनेक्टेड आहेत. सोबतच देशातील इतर शहरांशीदेखील या तिन्ही शहरांची उत्तम कनेक्टिव्हिटी आहे. त्यामुळे मुंबईपाठोपाठ पुणे आणि नाशकात जागोजागी विकासकामे सुरू आहेत. जागांच्या किमतीचा विचार करता मुंबईनंतर पुण्याचाच क्रमांक लागतो. मागच्या काही वर्षांत पुण्यात असंख्य बहुराष्ट्रीय कंपन्या स्थिरावल्या आहेत. कारखाने, आयटी कंपन्यांचे जाळे पुण्यात विणले गेले आहे. जागोजागी टोलेजंग टॉवर्स उभे राहिले असून परराज्यातील अनेकांनी आपले बस्तान पुण्यात बसवले आहे. हेच परप्रांतीय, धनदांडगे, राजकारणी वाट्टेल तेवढे पैसे मोजून स्थानिकांच्या जमिनी धडाधड विकत घेत आहेत.

मुंबईच्या पावलावर पाऊल ठेवून कॉस्मॉपॉलिटन शहर होत असलेल्या पुण्याच्या पालकमंत्रीपदाची धुरा उपमुख्यमंत्री उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे आहे. किंबहुना, सरकार कुठलेही असो आघाडीचे किंवा युतीचे. पुण्याचे पालकमंत्रीपद आपल्याच हाती राहील याची काळजी अजितदादांनी नेहमीच घेतलेली आहे. कधी आघाडी तर कधी युतीच्या सरकारमध्ये राहून उपमुख्यमंत्रीपदाचा विक्रम रचणाऱ्या अजित पवारांनी पुण्याच्या विकासात आतापर्यंत मोठा हातभार लावलेला आहे. केवळ बारामतीच नाही, तर पिंपरी-चिंचवड, पुणे शहर-उपनगराच्या विकासावर अजित पवारांचे अत्यंत बारीक लक्ष असते. मध्यंतरी चाकण औद्योगिक क्षेत्रातील वाहतूक कोंडीचा आढावा घेताना अजित पवारांनी अधिकाऱ्यांना रस्त्यावरील खड्डयांवरून लोकांच्या समक्ष झापले होते. अशा अजितदादांच्या मुलाला पुण्याच्या जमिनीत रेस कसा बरे नसेल? तीन-चार महिन्यांपूर्वी या व्यवहाराची चर्चा कानावर पडताच असे चुकीचे व्यवहार मान्य नसल्याचे पार्थ पवारांनी सांगितले होते. तरीही त्यांनी हा व्यवहार पुढे रेटलाच. या जमीन व्यवहाराशी आपला दुरान्वयानेही संबंध नाही, व्यवहाराचा पत्ता पार्थ पवारांच्या बंगल्याचा आहे. मुले सज्ञान होतात तेव्हा त्यांचा व्यवसाय करतात, असे म्हणत सुरुवातीला प्रसार माध्यमांपासून पळ काढणाऱ्या अजित पवारांनी कानावर हात ठेवले. नंतर स्वतःच प्रसार माध्यमांपुढे येऊन जमीन व्यवहार रद्द झाल्याचे सांगितले. प्रत्यक्षात सोन्याच्या भावाने पुण्यातील जमिनी विकल्या जात असताना १,८०० कोटींची महार वतनाची जमीन ३०० कोटींच्या कवडीमोल दराने पार्थ पवारांच्या कंपनीला मिळणे. त्यावर सरकारकडून २१ कोटींचा मुद्रांक शुल शुल्क माफ होणे, हे काही सहजासहजी घडलेले नाही. भलेही या व्यवहारात थेटपणे अजित पवारांचा सहभाग नसला, तरी या व्यवहारांवर अजित पवारांच्या पदाचा प्रभाव सरळसरळ दिसून येतो. तळे राखी तो पाणी चाखी... यापुढे माझ्या नावाचा गैरवापर करून कुणी चुकीचे व्यवहार करत असेल तर अधिकाऱ्यांनी ते व्यवहार जागीच थांबवा, चुकीचे व्यवहार मला खपणार नाहीत, असे अजित पवारांनी म्हणणे म्हणजे एकप्रकारे गुन्ह्याची कबुली देणेच आहे. त्यामुळे व्यवहार झालाच नाही असे म्हणून अजित पवारांना जबाबदारी झटकता येणार नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाच्या चौकशीसाठी समिती नेमली आहे. पार्थ पवार वगळून तिघांवर या जमीन घोटाळ्यात गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. यापैकी एकजण म्हणजे दिग्विजय पाटील हे पवार कुटुंबातलेच आहेत. पवारांचे घराणे हे राजकारण आणि उद्योग यांचा समतोल साधणारे घराणे म्हणून ओळखले जाते. काही वर्षांपूर्वी पार्थ पवारही वडिलांप्रमाणेच राजकारणात येण्यास इच्छुक होते. होते. २०१९ मध्ये मावळमधून खासदारकीसाठी उभे राहिलेल्या पार्थ यांना मतदारांनी त्यावेळी जमिनीवर दाणकन आपटले होते. तेव्हापासून ते राजकीय व्यासपीठावर फारसे दिसले नाहीत आणि आता थेट जमीन घोटाळ्यामुळे चर्चेत आले. महाराष्ट्रातील सिंचन घोटाळ्याचा आरोप हा अजित पवारांच्या राजकीय कारकिर्दीवरचा मोठा डाग समजला जातो. या घोटाळ्याच्या आरोपांमुळे अजित पवार ईडी कोठडीत जाण्यापासून थोडक्यात बचावले होते. पार्थ पवारांनी अजितदादांची अर्धवट राहिलेली कसर भरून काढली नाही म्हणजे मिळवले.




## खुळी मुले..

नवरा बायको दोघे
चालले रे नोकरीला
आई बाबा दोघांचे
कायमचे चाकरीला

सकाळची गड बड
ये वेग घड्याळाला
धावावे दुप्पटवेगाने
कळेना खट्याळाला

मिया बिबी चिडलेले
भांडेलागे भांड्याला
जीवपडतो भांड्यात
पाझर नसे धोंड्याला

जागेवर वस्तू नाहीत
पायफुटतात सर्वांना
मायबापावर चिडावे
दोघांना मुक्तपरवाना

रागनिघे नाष्ट्यावरती
चिवडतात रे अन्नाला
राग व्यक्त न् अव्यक्त
येई जे काही मनाला

कामआमचे सुरू राहे
जाताचं दोघे कामाला
दिवस भर कार्य मग्न
विश्रांती कुठे हमाला

खूप दमून सायंकाळी
पाखरे परतले घराला
नवी सेवा सुरु आमची
उर्जा आणते शरिराला

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध अचूक बातमी

# बांगलादेशची नवी कुरापत !!



बांगलादेश हा भारताचा सख्खा शेजारी देश. एकेकाळी भारतातच असलेला आणि भारतामुळेच पाकिस्तानच्या जोखडातून मुक्त झालेला देश. १९७१ साली भारतानेच पाकिस्तानला युद्धात पराभूत करून बांगलादेशची निर्मिती केली. बांगलादेशची निर्मिती झाल्यापासून भारताचे बांगलादेशशी कायम मित्रत्वाचे संबंध होते. बांगलादेश भारताचा शेजारी असला तरी भारताने त्याला कायम छोट्या भावा सारखीच वागणूक दिली आहे.

बांगलादेशवर ज्या ज्या वेळी संकटे आली त्या त्या वेळी भारतच धावून गेला त्यामुळे गेल्या अनेक पाच दशकांपासून भारत आणि बांगलादेशचे संबंध मैत्रीपूर्ण आणि सौहार्दाचे राहिले आहेत मात्र या संबंधांना मागील काही वर्षात तडा गेला आहे. भारत बांगलादेश संबंधातील सौहार्दात कटुता निर्माण होऊन दोन्ही देशात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली आहे. हा तणाव कमी करून दोन्ही देशात पूर्वी प्रमाणे मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न भारताकडून होत असताना बांगलादेश मात्र काही तरी कुरापती काढून दोन्ही देशातील तणाव कायम ठेवत आहे. विशेषतः मोहम्मद युनूस हे बांगलादेश सरकारचचे हंगामी प्रमुख झाल्यापासून या तणावात खूप भर पडली आहे. मोहम्मद युनूस हे सतत काहीतरी कुरापत काढून दोन्ही देशातील तणावात भर घालत आहे. आताही त्यांनी अशीच एक कुरापत काढून भारताला चिथावणी देण्याचा प्रयत्न केला आहे. बांगलादेशच्या हंगामी सरकारचे प्रमुख असलेल्या मोहम्मद युनूस यांना ग्रेटर बांगलादेशची स्वप्ने पडू लागली आहेत कदाचित त्यामुळेच त्यांनी भारताच्या ईशान्येकडील राज्याचा समावेश करून बांगलादेशचा नवा नकाशा प्रदर्शित केला इतकेच नव्हे तर भारताला चिथवण्यासाठी त्यांनी हा नकाशा भारताचा शत्रू असलेल्या पाकिस्तानच्या संरक्षणदल प्रमुखांना आणि ऑपरेशन सिन्दुर मध्ये पाकिस्तानला साथ देणाऱ्या तुर्कीच्या संरक्षणदल प्रमुखांना भेट दिला. भारताचा भूभाग असलेला प्रदेश आपल्या नकाशात दाखवून तो नकाशा भारताच्या शत्रू राष्ट्रांना भेट देणे ही कृती भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणारीच आहे म्हणूनच भारताने मोहम्मद युनूस यांच्या या कृतीची गंभीर दखल घेऊन बांगलादेशला जशास तसे उत्तर द्यायला हवे. भारताने तशी याची दखल घेतलीच आहे. भारताचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी याची दखल घेऊन मोहम्मद युनूस यांना नेमक्या शब्दात समज दिली आहे. भारताला बांगलादेश बरोबर तणाव वाढवण्याची इच्छा नाही मात्र आपण काय करत आहोत याचा नीट विचार मोहम्मद युनूस यांनी करावा असे राजनाथ सिंग यांनी बजावले आहे. त्याचवेळी बांगलादेशने भारताला आव्हान मिळाले तर त्याला मुखभंग करणारे प्रत्युत्तर देण्यास भारत कचरणार नाही असा इशाराही त्यांनी बांगलादेशला दिला आहे. मोहम्मद युनूस सातत्याने भारताच्या कुरापती काढून भारताला चिथावत आहेत भारत मात्र संयमाने परिस्थिती हाताळत आहे कदाचित त्यामुळेच मोहम्मद युनूस यांची मजल वाढत चालली आहे. मोहम्मद युनूस गेल्या काही महिन्यांपासून चीन, पाकिस्तान आणि तुर्की या देशांच्या साहाय्याने भारताला आव्हान देण्याची तयारी करत आहेत. विशेषतः ईशान्येकडील राज्यांना भारताच्या उर्वरित भूभागागी जोडणाऱ्या सिलीगुडी कॉरिडॉर किंवा चिकन नेकची कोंडी करण्याची भाषा मोहम्मद युनूस बोलत आहेत. पाकिस्तानच्या लष्करी अधिकाऱ्यांना बांगलादेशच्या सीमेतून या भूभागाची पाहणी करण्याची संधी देखील युनूस यांच्या सरकारने दिली होती. याबरोबरच चिकन नेक जवळील बांगलादेशचा हवाई तळ चीनकडे सोपवण्याची तयारीही बांगलादेशने केली आहे. भविष्यात जर भारताशी संघर्ष वाढलाच तर चीन, पाकिस्तान आणि तुर्की हे देश आपल्या पाठीशी उभी राहतील असा विश्वास त्यांना वाटतो म्हणूनच ते या देशांना कुरवाळत आहेत. यातच सध्या भारत आणि अमेरिकेचे संबंध बिघडले आहेत त्याचा फायदा घेऊन अमेरिकेला खुश करण्याची तयारीही मोहम्मद युनूस यांनी केली आहे त्यासाठी ते बांगलादेशचे सेट मार्टिन बेट अमेरिकेच्या हवाली करण्याच्या तयारीत आहेत. या सर्व बाबींचा विचार करता हा सर्व प्रकार भारताला चिथावणी देणारेच आहे. अर्थात इतके सर्व घडत असूनही भारताने संयमाची भूमिका सोडली नाही कदाचित त्यामुळेच मोहम्मद युनूस यांची मजल वाढत चालली आहे ते भारताच्या संयमाला भारताची कमजोरी समजू लागले आहेत पण भारताचा संयम ही भारताची कमजोरी नाही. भारताचा संयम संपला तर बांगलादेशचे नाव जगाच्या नकाशातून गायब होऊ शकते याचेही भान मोहम्मद युनूस यांनी ठेवावे. जो भारत बांगलादेशची निर्मिती करू शकतो तोच भारत बांगलादेशला संपवूही शकतो हे मोहम्मद युनूस यांच्या जितक्या लवकर लक्षात येईल तितके त्याचे आणि त्यांच्या देशासाठी भल्याचे ठरेल.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५**


This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## कोचाई येथे भीषण मोटारसायकल अपघात

### विकास वरठा या तरुणाचा दुर्दैवी मृत्यू





**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०९, तलासरी (पालघर) :** तलासरी तालुक्यातील कोचाई पाटीलपाडा येथे दिनांक ०८ नोव्हेंबर २०२५ रोजी मध्यरात्री दोन मोटारसायकलींमध्ये झालेल्या समोरासमोर धडकेत एका तरुणाचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या अपघातात विकास दामू वरठा (वय २३, रा.कोचाई पाटीलपाडा) या तरुणाचा मृत्यू झाला असून समोरून येणाऱ्या मोटारसायकलवरील दोघे युवक जखमी झाले आहेत.

प्राप्त माहितीनुसार, विकास वरठा हा एका कंपनीत रात्रपाळीचे काम करून घरी परतत असताना कोचाई पाटीलपाडा येथे समोरून येणाऱ्या स्पॉट बाईकवरील युवकांनी भरधाव वेगात गाडी चालवित समोरून धडक दिली. अपघात इतका भीषण होता की मोटारसायकलीचा पुढील भाग पूर्णपणे चिरडला गेला, तर टायर काही अंतरावर फेकला गेला. या धडकेत विकास वरठा यांचा जागीच मृत्यू झाला.

विकास वरठा हा घरातील एकुलता एक मुलगा होता. त्याने शिक्षण पूर्ण करून पदवी प्राप्त केली होती आणि एका नामांकित फॅक्टरीत ऑफिस विभागात जबाबदारीच्या पदावर कार्यरत होता. तो अत्यंत हुशार, प्रामाणिक, शांत व कुटुंबप्रेमी स्वभावाचा म्हणून ओळखला जात होता. त्याच्या अकाली निधनाने कोचाई परिसरात शोककळा पसरली आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, सध्या परिसरात अनेक युवक रात्री उशिरापर्यंत मोटारसायकलींवर फिरत असतात, नशेच्या आहारी गेलेले असून वाहन चालविताना निष्काळजीपणा करतात. अशा बेपर्वा वाहनचालकांमुळे एका सुशिक्षित व जबाबदार तरुणाचा जीव गेला, ही अत्यंत दुर्दैवी घटना असल्याचे ग्रामस्थांचे मत आहे.

## जोगेश्वरीत ‘आरोग्य जागरूकता’अभियान




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९ मुंबई :** रोटरी क्लब ऑफ मुंबई शिवाजी पार्क तर्फे एक एहसास : आत्महत्याप्रतिबंधाबाबत जागरूकता या उपक्रमांतर्गत आरजेएम डीएस इंग्लीश स्कुल जोगेश्वरी मधे मानसिक आरोग्याविषयी जागरूकता सत्राचे यशस्वी आयोजन नुकतेच करण्यात आले होते.कौन्सेलिंग सायकोलॉजिस्ट स्वेता रामकृष्ण सुखम मनस या उपक्रमाच्या संस्थापक यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला. त्यांनी भावनिक जागरूकता, आत्मसंवाद आणि मानसिक संतुलन याबाबत अतिशय समजण्यासारख्या आणि प्रेरणादायी पद्धतीने मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला संस्थेचे उपकार्याध्यक्ष अशोक परब, आरजेएमडीएस इंग्लिश स्कूल चे सीईओ श्री दिपक खानविलकर, शाळेच्या कमिटी सदस्या इंद्रायणी सावंत, मुख्याध्यापिका डींपल मॅडम व शबनम मॅडम उपस्थित होते . या सत्राला क्लबच्या उपाध्यक्षा प्रज्ञा सिन्हा, सचिव समृद्धी जठार आणि क्लब सदस्य जय जगताप आदी मान्यवर देखील उपस्थित होते.

## प्रचंड उत्साहात प्रोजेक्ट महादेवा ठाणे जिल्हा निवड चाचण्या संपन्न

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०८, ठाणे :** महाराष्ट्र शासन क्रीडा विभाग, महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्र), सिडको आणि वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन (WIFA) यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यात फुटबॉल खेळाचा विकास, प्रचार आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने महादेवा ही महत्त्वाकांक्षी योजना राबविण्यात येत आहे. या योजनेच्या माध्यमातून राज्यातील युवा खेळाडूना फुटबॉलमध्ये करिअर करण्याच्या दृष्टीने प्रोत्साहन देणे हे प्रमुख उद्दिष्ट आहे. या योजनेचा एक भाग म्हणून, राज्यातील १३ वर्षांखालील मुले व मुलीसाठी जिल्हा, विभाग आणि राज्य स्तरावर फुटबॉल निवड चाचण्यांचे आयोजन करण्यात येत आहे. ठाणे जिल्ह्यातील खेळाडूंची निवड चाचणी दि.०१ नोव्हेंबर २०२५ रोजी मुले व ०२ नोव्हेंबर २०२५ रोजी मुली यशवंतराव चव्हाण फुटबॉल मैदान, सेक्टर १९, नेरूळ, नवी मुंबई येथील क्रीडांगणात यशस्वीपणे आयोजित करण्यात आली. ही चाचणी जिल्हा क्रीडा अधिकारी (DSO) कार्यालय, ठाणे आणि ठाणे फुटबॉल असोसिएशन (TFA) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. दोन दिवस चाललेल्या या निवड चाचण्यांमध्ये ठाणे जिल्ह्यातील तरुण फुटबॉलपटूंनी दाखविलेला सहभाग, शिस्त आणि उत्साह पाहता ठाणे जिल्ह्यातील फुटबॉल संस्कृती व तरुण प्रतिभा विकासाबाबतची बांधिलकी अधोरेखित झाली. या निवड प्रक्रियेत पहिल्या दिवशी ३५५ मुले आणि दुसऱ्या दिवशी ६४ मुली अशा एकूण ४१९ खेळाडूंनी सहभाग घेतला. काटेकोर निवड प्रक्रियेनंतर २० मुले व २० मुलींची ठाणे जिल्ह्याच्यावतीने पुढील विभागीय फेरीसाठी निवड करण्यात आली. विभागीय व त्यानंतर राज्य स्तरावर निवड होणाऱ्या खेळाडूंना दि.१४ डिसेबर,२०२५ रोजी मुंबई येथे जागतिक कीर्तीचे फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी यांच्यासोबत खेळण्याची एक अभूतपूर्व संधी मिळणार आहे.

**या कार्यक्रमाचे मार्गदर्शन आणि देखरेख खालील मान्यवरांनी केले :-**

ठाणे फुटबॉल असोसिएशन सचिव सुनील पुजारी, जिल्हा क्रीडा अधिकारी, ठाणे सुवर्णा बारटक्के, क्रीडा अधिकारी, ठाणे सिद्धार्थ वाघमारे, ठाणे फुटबॉल असोसिएशन सहसचिव अमजद खान, मैच कमिशनर, WIFA शीतल रसालम.

WIFA नियुक्त स्काउट्स हेमंत पावळे, सुप्रित जेठाणा, सम्राट राणा आणि श्रुती लक्ष्मी व्ही.के.यांनी खेळाडूची तांत्रिक, रणनीती व शारीरिक निकषावर काटेकोर तपासणी केली.

**ठाणे जिल्हा अंतिम निवड यादी :**

**अंडर - १३ मुले (जन्म २०१२ च २०१३) :-** आर्यव्रत आशिष सरस्वत, निहार विकास नांबियार, आर्य राममूर्ती नायडू, दैविक कमलेश गलानी, रणवीर सिंह चावला, आरव चंद्रकांत सोनवणे, मल्हार लक्ष्मीकांत सावंत, अनय अमित भुसकुटे, तनिष चंद्रशेखर मल्लि, आर्यन संतोष पिंगळे, लक्ष्य नरेश मळकर, गिरीश मेनन, एफ्रॉन ॲग्नेलो डिसा, कनिष्क संजय मिश्रा, निहार कृष्ण एस, तनय रंजीत, शीहान बॅनर्जी, विहान नागधर बांदी, स्वरित संजय सातपुते व हर्षित नरेंद्र निकम.

**अंडर - १३ मुली (जन्म २०१२ व २०१३) :-** स्वयमप्रभा महाराणा, जीविका राजपूत, निहारिका सुरेश, हना खान, स्वर विक्रम कुदळे, नव्या पाटील, जीविका रुपेजा, कृतिका राय, दुर्वा तर्मळे, रेबेका सिबी, समायरा सिग, कियाराह अनिरुद्ध सराफ, मन्नत धीरज आहुजा, अक्षरा आदर्श शेट्टी, आश्मी आदर्श शेट्टी, आरझू विकास कदम, लावण्य रविंद्र ठाकरे, अनु मेघा रूपेश, त्रयी प्रभाष शेट्टी व फाटक इराम शमशुद्दीन.

प्रोजेक्ट महादेवा हा उपक्रम महाराष्ट्रभरातील तरुण फुटबॉल प्रतिमा शोधण्यासाठी आणि त्यांना योग्य प्रशिक्षण देण्यासाठी एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरत आहे. ठाणे जिल्ह्यातील या निवड चाचण्यांनी पुन्हा एकदा सिद्ध केले की, ठाणे जिल्ह्यातील फुटबॉलची पायाभरणी मजबूत असून भविष्यात अनेक उत्कृष्ट खेळाडू राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर ठसा उमटवत्तील, असे ठाणे जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के यांनी कळविले आहे.

# नगर - मनमाड महामार्ग विकासकामांसाठी ४.६८ कोटींचा निधी

## खासदार नीलेश लंके यांच्या पाठपुराव्याला यश; महामार्ग विकासाला मिळणार गती

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०९, अहिल्यानगर :** अहिल्यानगर लोकसभा मतदारसंघातील राष्ट्रीय महामार्ग विकासाच्या दिशेने म हत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने अहिल्यानगर बायपासवरील पूरप्रवण भागातील सुधारणा, पूरनियंत्रण तसेच सुविधा विकासासाठी तब्बल ४.६८ कोटी रुपयांच्या निधीला प्रशासकीय मंजुरी दिली असल्याची माहिती खासदार नीलेश लंके यांनी दिली.

खासदार लंके यांनी सांगितले की, ही मंजुरी केवळ निधीपुरती मर्यादित नाही, तर गेल्या अनेक महिन्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे हे फलित आहे. दिल्लीतील मंत्रालयीन चर्चेनंतर अखेर ही कामे मंजूर झाली असून, येत्या काही दिवसांत प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू



होणार आहे.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या मुंबई क्षेत्रीय कार्यालयाकडून नुकतेच जारी आदेशानुसार पुढील प्रमुख कामांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यात सारोळाबद्दी येथे सर्व्हिस रोड व आरसीसी गटार बांधकाम, नारायणडोह, नेप्ती (कल्याण जंक्शन) व पुणे जंक्शन परिसरात आरसीसी गटार कामे, आरणगाव येथे पथदिव्यांची उभारणी, मांडळी–नागमठाण व देहेरे येथील बोगद्यांचे बांधकाम व दुरुस्ती यांचा समावेश आहे.

ही सर्व कामे पुढील १५ ते ३० दिवसांत सुरू होणार असून, संबंधित कंत्राटदार व प्रकल्प संचालक कार्यालयाला यासंदर्भात निर्देश देण्यात आले आहेत. सध्या विविध टप्प्यांवर जलद गतीने काम सुरू आहे. त्यात राहुरी ते राहुरी फॅक्टरी विभागातील एक बाजूचे काम पूर्णत्वाकडे, लवकरच वाहतुकीसाठी खुला होईल. कोल्हार – बाबळेश्वर विभाग डांबरीकरणासाठी तयार आहे. तर शनिशिंगणापूर फाटा ते विळद बायपास विभागात प्रत्यक्ष काम सुरू असून, प्रकल्प नियोजनाप्रमाणे पुढे सरकत असल्याचे खासदार निलेश लंके म्हणाले.

**“कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नगर- मनमाड महामार्ग कामाला वेग”**

कुंभमेळा २०२७ लक्षात घेता नगर मनमाड राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६० या अत्यंत महत्त्वाच्या मार्गावरील कामांना गती देण्यात आली आहे. हा प्रकल्प मिश्र वार्षिक पद्धत या तत्त्वावर राबविला जात असून, एप्रिल २०२७ पर्यंत पूर्णत्वाचा करार असला तरी डिसेंबर २०२६ पर्यंत काम पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. या महामार्गाच्या कामासाठी मी स्वतः ११ जुलै २०२५ रोजी बेमुदत आंदोलन केले होते. त्यानंतर केंद्र सरकार व एनएएआय प्रशासनाने तत्काळ लक्ष घालून कुंभमेळा पूर्वी हे कामाला प्रत्यक्ष सुरुवात केली असून ते काम पूर्ण करण्याचे लक्ष्य आहे. असे खासदार लंके यांनी सांगितले.

# घराणेशाहीला हटवूया, लोकशाहीला नटवूया !!



आपल्या देशात फार पूर्वीपासून घराणेशाही अस्तित्वात आहे. राजकीय पक्षाचे नेते आपल्याच घरातील सदस्याला किंवा नातेवाईकाला राजकारणात स्थान देत आहेत. गोरगरीब व सर्वसामान्य जनतेला डावलून घरातील सदस्याला निवडणुकीला उभे करत आहेत. एक राजकारणी मेला किंवा त्याने राजकारणातून संन्यास घेतला की लगेच त्यांच्याच घरातील दुसरा राजकारणी इलेक्शनला उभा राहतो. पण गोरगरीब, कष्टकरी व सर्वसाम ान्य जनतेला निवडणुकीला उभे करण्यासाठी कोणताच राजकारणी पुढाकार घेत नाही. प्रत्येकाला घरातील नातेवाईक उभा करावा वाटतो. म्हणजे येणारी सत्ता दुसऱ्याच्या ताब्यात न जाता केवळ आपल्या ताब्यात असली पाहिजे हा त्यांचा यामागचा मुख्य उद्देश असतो. आपल्या देशात जेवढे काही राजकारणी आहेत ते सर्व राजकारणी आपल्याच घरातील सदस्याला निवडणुकीच्या रिंगणात उभे करतात आणि त्यांना निवडून आणण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करतात व त्यासाठी भरमसाठ पैसा उधळतात. मग तो उमेदवार सुशिक्षित असो अथवा अल्पशिक्षित असो, त्याला राजकीय क्षेत्र यशस्वीपणे हाताळण्याचे नॉलेज असो अथवा नसो याचे त्यांना काहीही देणे घेणे नसते. कसाही वेडा गबाळा व अज्ञानी राजकारणी निवडणुकीला उभा करून केवळ पैशाच्या जोरावर त्याला निवडून आणणे आणि घराणेशाहीला शाबूत ठेवणे हे आजकालच्या राजकारणी लोकांचे धोरण झाले आहे. विचार केला असता आपल्याला असे दिसून येईल की, आपल्या देशात जेवढे राजकारणी आहेत ते घराणेशाही चालवत आहेत. इंदिरा गांधी पासून राहुल गांधी व प्रियंका गांधी पर्यंत राजकीय घराणेशाही चालू आहे. शरद पवार पासून सुप्रिया सुळे व अजित दादा पवार यांच्यापर्यंत घराणेशाही सुरू आहे. बाळासाहेब ठाकरे पासून आदित्य ठाकरे पर्यंत घराणेशाही सुरू आहे. म्हणजे येणारी सत्ता ही आलटून पालटून त्यांच्याच घरामध्ये आली पाहिजे. सत्तेची किल्ली ही त्यांच्याच हातामध्ये असली पाहिजे. असे धोरण आजकालच्या राजकीय लोकांचे झाले आहे. राजकीय घराणेशाही शाबूत ठेवण्यासाठी जाणीवपूर्वक सर्वसामान्य उमेदवाराला डावलले जात आहे. पक्षाचे तिकीट अथवा उमेदवारी ही उच्चशिक्षित व राजकीय वलय असणाऱ्या सर्वसामान्य माणसाला न देता आपल्याच घरातील सदस्याला देऊन त्यांना निवडून आणण्यासाठी अतोनात प्रयत्न केले जातात. पूर्वी राजेशाही अस्तित्वात होती. राज्याच्या नंतर त्यांच्याच घरातील राजपुत्र गादीवर बसायचा. कालांतराने भारतीय संविधान अस्तित्वात आले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी राजेशाही नष्ट करून लोकशाही अस्तित्वात आणली. लोकशाहीच्या काळात कोणालाही निवडणुकीला उभे राहण्याचे स्वातंत्र्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानात लिहून भारतीयांवर कधीच न फिटणारे उपकार करून ठेवले आहेत. पक्षाने जरी एखाद्या लायक व्यक्तीला डावलले तरी अपक्ष उभे राहण्याचे स्वातंत्र्य बाबासाहेबांनी आपल्याला दिले आहे. घराणेशाही अस्तित्वात ठेवायची का घराणेशाहीला संपवायचे? हे सुजाण मतदार बंधू आणि भगिनींच्या हातामध्ये आहे. घराणेशाहीला संपवण्यासाठी सुजाण मतदार बंधू आणि भगिनींनी घराणेशाहीतून उभे टाकलेल्या उमेदवाराला मतदान न देता सर्वसामान्य, उच्चशिक्षित आणि राजकीय क्षेत्राची जाण असणाऱ्या उचित उमेदवाराला निवडून देणे आणि घराणेशाहीला संपवणे हे आपल्या हातात आहे. म्हणून घराणेशाहीला संपवण्यासाठी माझ्या सुजाण मतदार बंधू आणि भगिनींना विनंती आहे की, घराणेशाहीला नष्ट करून योग्य व लायक उमेदवाराला निवडून आणावे असे मला वाटते. त्यासाठी सुजाण मतदार बंधू आणि भगिनींनी त्यांच्या कोणत्याच भूलथापांना बळी न पडता, त्यांच्या आश्वासनांवर विश्वास न ठेवता, त्यांनी दिलेल्या हजार पाचशेच्या नोटांना बळी न पडता निवडणुकीत त्यांच्या विरोधात प्रचार करून घराणेशाही संपवणे हे माझ्या सुजाण मतदार बंधू आणि भगिनींच्या हातात आहे. जोपर्यंत तुम्ही सर्वसाम ान्य गोरगरीब व शेतकरी उमेदवाराच्या हातात सत्तेची किल्ली देणार नाही तोपर्यंत या देशाचा पूर्णपणे विकास होणार नाही हे आमच्या मतदार बंधू आणि भगिनींनी लक्षात घ्यायला हवे. त्यासाठी घराणेशाहीला संपवूया आणि लोकशाहीला निवडून आणूया. जोपर्यंत घराणेशाही संपणार नाही तोपर्यंत देशाचा विकास होणे शक्य नाही. तेव्हा समस्त मतदार बंधू आणि भगिनींना विनंती आहे की, माझ्या बंधू आणि भगिनींनो घराणेशाहीला मुठमाती देऊन लोकशाहीचा पुरस्कार करणाऱ्या उमेदवाराला निवडून आणण्यासाठी सज्ज होऊया. छत्रपती शिवाजी महाराजांचे व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न साकार करूया... त्यासाठी पुन्हा एकदा हात जोडून मतदार बंधू आणि भगिनींना विनंती आहे की जोपर्यंत घराणेशाहीचा नायनाट होणार नाही तोपर्यंत हा देश जगाची महासत्ता होणार नाही हे कोणालाही नाकारता येणार नाही... घराणेशाहीला हटवूया लोकशाहीला नटवूया

**बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जि.लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# मिरा-भाईंदर शहरात जेष्ठ नागरिक केंद्राचे लोकार्पण संपन्न

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०९, मिरा भाईंदर :** आयुष्यभर कुटुंब, समाज आणि पुढील पिढ्यांच्या घडणीत आपले आयुष्य अर्पण करणाऱ्या जेष्ठ नागरिकांना सन्मानाचे, आपुलकीचे आणि आनंदाचे व्यासपीठ मिरा-भाईंदर शहरात उभे राहिले आहे. हिंदुहृदयसम्राट स्व.बाळासाहेब ठाकरे कलादालन येथे महाराष्ट्र राज्य परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्हा पालकमंत्री प्रताप इंदिराबाई बाबुराव सरनाईक यांच्या शुभहस्ते जेष्ठ नागरिक केंद्राचा लोकार्पण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

मंत्री प्रताप सरनाईक यांच्या संकल्पनेतून आणि पुढाकारातून साकारलेले हे केंद्र म्हणजे केवळ विरंगुळ्याचे ठिकाण नसून, जेष्ठांच्या जीवनात नवचैतन्य फुंकणारा एक सामाजिक उपक्रम आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जेष्ठांसाठी तयार करण्यात आलेल्या या केंद्रात पारंपरिक खेळ, ऐतिहासिक माहिती, जुन्या गाण्यांचा संग्रह, आरोग्यविषयक सुविधा आणि छोट्या गटासाठी सांस्कृतिक कार्यक्रमांची सोय अशा अनेक उपक्रमांचा समावेश आहे.

**जेष्ठ नागरिक केंद्रातील प्रमुख वैशिष्ट्ये :**

- बुद्धिबळ, साप-शिडी, लुडो यांसारखे पारंपरिक खेळ आधुनिक पद्धतीने साकारलेले
- १९७० पासून ते आजपर्यंतच्या इतिहासाचे व्हिज्युअल प्रदर्शन
- जुनी गाणी आणि सुवर्णकाळातील आठवणींचा संगीतसंग्रह
- अख तंत्रज्ञानाद्वारे आरोग्यविषयक माहिती व व्यायाम मार्गदर्शन
- जेष्ठांसाठी छोट्या गटांमध्ये सांस्कृतिक व गेट-टुगेदर कार्यक्रमांची सुविधा



या केंद्राच्या माध्यमातून मिरा-भाईंदरमधील जेष्ठ नागरिकांना सम ाजात पुन्हा एकदा सक्रिय भूमिका बजावण्याची, संवाद साधण्याची आणि आपल्या छंदांना नवी दिशा देण्याची संधी मिळणार आहे. या प्रसंगी मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले कि, मिरा-भाईंदर हे वेगाने विकसित होणारे शहर आहे. या शहराच्या प्रगतीसोबतच आपल्या जेष्ठांचा सन्मान, त्यांचं समाधान आणि आनंद कायम ठेवणं हेच आमचं कर्तव्य आहे. जेष्ठांच्या चेहऱ्यावर पुन्हा हास्य फुलवणं हीच आमच्यासाठी खरी सामाजिक बांधिलकी आहे. जेष्ठांच्या अनुभवानं आणि आशीर्वादानं समाज अधिक समृद्ध होत असतो, या जाणिवेतून साकारलेले हे जेष्ठ नागरिक केंद्र मिरा-भाईंदरच्या सामाजिक आणि सांस्कृतिक वाटचालीत एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे.

# युवतींच्या आत्मनिर्भर तेथूनच घडणार सक्षम समाज - आ.जोरगेवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०९, चंद्रपूर :** आजच्या काळात महिलांनी प्रत्येक क्षेत्रात आपली छाप उमटवली आहे. शिक्षण, विज्ञान, राजकारण, उद्योजकता या सर्व क्षेत्रांत स्त्रिया सक्षमपणे काम करत आहेत. मात्र, अजूनही काही ठिकाणी संधी कमी आणि अडथळे जास्त आहेत. हे अडथळे दूर करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार सातत्याने प्रयत्न करत आहे. आजची भारतीय स्त्री कुठेच मागे नाही. परंतु केवळ यश मिळवणे पुरेसे नाही; ते टिकवण्यासाठी आत्मविश्वास, शिक्षण आणि स्वावलंबन आवश्यक आहे. युवतींच्या आत्मनिर्भर तेथूनच सक्षम समाज घडणार असल्याचे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले. भारतीय जनता पार्टी युवती आघाडीच्या वतीने आ. किशोर जोरगेवार यांच्या जनसंपर्क कार्यालयात युवती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.



## भारतीय जनता पार्टी युवती आघाडीच्या वतीने युवती मेळावा

या कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमाला भारतीय जनता पार्टी महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, युवती प्रमुख प्रियंका चिताडे, महामंत्री मनोज पाल, सविता दंढारे, रवि गुरुनुले, ग्रामीण तालुका अध्यक्ष विनोद खेवले, मंडळ अध्यक्ष स्वप्निल डुकरे, आशिष देवतळे, राकेश पिंपळकर, सुमित बेले, सुभाष पिंपळकर, सायली येरणे आदी मान्यवरांची मंचावर उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना आ.जोरगेवार म्हणाले की, युवतींच्या आत्म निर्भरतेतूनच एक सक्षम समाज उभा राहतो. जेव्हा युवती आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या सबळ होते, तेव्हा तिचं कुटुंब, तिचं गाव आणि अखेर संपूर्ण देश सक्षम बनतो. हा मेळावा केवळ कार्यक्रम नाही, तर स्त्रीशक्तीचा उत्सव आहे. युवतींच्या जिद्दीत जग बदलण्याची ताकद आहे.

'मी करू शकते', 'मी बदल घडवू शकते' हा आत्मविश्वास प्रत्येक युवतीच्या मनात जागा व्हावा, असे ते म्हणाले. ते पुढे म्हणाले की, 'लाडकी बहिण योजना', 'बेटी बचाओ बेटी पढाओ', 'मुद्रा योजना', 'महिला उद्योजकता विकास' अशा योजनांच्या माध्यमातून महिलांना आर्थिक स्वावलंबन आणि सामाजिक सन्मान मिळत आहे. तुम्ही या योजनांचा लाभ घ्या, स्वतःचा व्यवसाय सुरू करा आणि समाजात नवे आदर्श निर्माण करा, असे आवाहन त्यांनी युवतींना केले.

चंद्रपूर जिल्ह्यातील प्रत्येक युवती आत्मनिर्भर व्हावी, यासाठी कौशल्य विकास केंद्रे, प्रशिक्षण शिबिरे आणि स्वयंरोजगार योजना हाती घेण्यात येणार आहेत. आपण यापूर्वी ब्युटी पार्लर, फॅशन डिझायनिंग, शिवण क्लास यांसारख्या महागड्या प्रशिक्षणांची मोफत सोय करून दिली आहे. चंद्रपूर मतदारसंघात झालेल्या ७० हून अधिक प्रशिक्षण शिबिरांमधून तीन हजारांहून अधिक महिला आणि युवतींना आपण प्रशिक्षित केले असल्याचे ते यावेळी म्हणाले. या कार्यक्रमाचे संचालन भाग्यश्री हांडे यांनी केले. मेळाव्याला युवतींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# थोडक्यात

## ठाण्यात सायकल राईडमधून एचआयव्ही - एड्स जनजागृतीचा संदेश

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०८, ठाणे :** जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष, जिल्हा सामान्य रुग्णालय, ठाणे आणि आम्ही सायकल प्रेमी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आज सकाळी एचआयव्ही-एड्स आणि सिफिलीस बाबत युवकांमध्ये जनजागृतीपर सायकल राईड आयोजित करण्यात आली होती. या सायकल राईडमध्ये पाच वर्षे वयोगटापासून ते ७७ वर्षापर्यंतच्या ज्येष्ठांपर्यंत २८७ सायकल प्रेमींनी सहभाग घेतला.



सर्व सायकल प्रेमींनी आम्हा सगळ्यांना एक शिकवण दिली की, आपण सकाळी लवकर उठून फिटनेसकडे लक्ष दिले पाहिजे, त्यामुळे त्यांच्याकडे पाहून एक नवीन ऊर्जा मिळाली. अनेकांना एचआयव्ही पॉझिटिव्ह आणि एड्स हे दोन शब्द उच्चारले की भीती वाटते. पूर्वी या आजाराबद्दल अत्यंत भीती होती मात्र जनजागृतीमुळे ही भीती दूर झाली, असे मत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.कैलास पवार यांनी व्यक्त केले. सकाळी मान्यवरांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून सायकल राईडला सुरुवात झाली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.पवार पुढे म्हणाले की, सर्व सायकल प्रेमींना पाहून आजची सकाळ ही अत्यंत उत्साही आणि ऊर्जा देणारी होती. जसा आता क्रिकेटमध्ये महिलांचा सहभाग वाढत चालला आहे तसाच सायकलिंग मध्ये देखील महिलांचा सहभाग वाढला पाहिजे. कारण त्यांच्या सहभागाशिवाय प्रत्येक क्षेत्र अपूर्णच आहे. अनेकांना एचआयव्ही पॉझिटिव्ह आणि एड्स याबद्दल संभ्रमता आहे परंतु या दोन्ही आजारांमध्ये मोठा फरक आहे. आपली वाटचाल ही निरोगी आयुष्याकडे असली पाहिजे. एचआयव्ही मुक्त भारत यासाठी सगळ्यांनी प्रयत्न केला पाहिजे, असे सांगत जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.कैलास पवार यांनी एचआयव्ही पॉझिटिव्ह आणि एड्स या दोघांमधला फरक स्पष्ट केला.

# विश्वंभरबाबा कार्तिकी पायी दिंडीचे आळंदी कडे प्रस्थान

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.०९, मेढा (सातारा) :** विश्वंभरबाबा कार्तिकी पायी दिंडी सोहळा जावळी मेढा विभाग यांचे वतीने गांजे - मामुर्डी ते आळंदी पायी दिंडी सोहळा प्रस्थान नुकतेच संपन्न झाले. या दिंडी सोहळ्याता ६५ वर्ष पूर्ण होत आहेत. प्रातः स्मरणीय वै.गुरुवर्य ह.भ.प भिकोबा महाराज देशमुख गांजे यांच्या कृपाशीर्वादाने, त्यांचे नातू ह.भ.प अतुल महाराज देशमुख गांजे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतीवर्षी प्रमाणे विश्वंभरबाबा कार्तिकी पायी दिंडी सोहळा जावळी मेढा विभाग गांजे येथून समस्त ग्रामस्थांच्या वतीने तसेच वै.ह.भ.प अनाजी महाराज मामुर्डी वै.ह.भ प हरि बुवा महाराज चोरांबे यांच्या शुभाशीर्वादाने, ग्रामस्थांच्या सहकार्यातून मामुर्डी, चोरांबे येथून प्रस्थान झाला. मेढा या ठिकाणी आल्यानंतर सर्व वारकरी भाविकांना एकत्र घेऊन

श्री विठ्ठल मंदिर मेढा येथून आळंदी कडे प्रस्थान केले. यामध्ये मौजे सरताळे, सुरूर परीठ मळा, पारगाव खंडाळा, शिंदेवाडी, शिवरे, पुणे या प्रत्येक गावी मुक्काम करीत अलंकापुरी आळंदी येथे शुक्रवार, दिनांक १४



नोव्हेंबर २०२५ रोजी पोहोचणार आहे. प्रतिवर्षीप्रमाणे प्रत्येक गावचे ग्रामस्थ तसेच अन्नदाते सर्व वारकऱ्यांची राहण्याची तसेच अल्पोपहार, दुग्धपान, महाप्रसाद याचे आयोजन करण्यात आले आहे. मुक्काम ठिकाणी रोज सायंकाळी सुंदर अशा वक्त्यांचे कीर्तनाच्या माध्यमातून सर्वांना मार्गदर्शन मिळणार आहे.

एकादशी दिवशी आळंदी येथे विश्वंभरबाबा अध्यात्मिक वारकरी शिक्षण संस्थेतील सर्व बाल वारकऱ्यांचा सुंदर असा भजनाचा कार्यक्रम तसेच आळंदी दिंडी नगर प्रदक्षिणा, सायंकाळी प्रवचन, हरिपाठ व ह.भ.प युवा कीर्तनकार दीपेश महाराज जाधव यांचे कीर्तन संपन्न होणार आहे. रविवार, दि.१६ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ०८ ते १० या वेळेमध्ये दिंडी सोहळा प्रमुख ह.भ.प अतुल महाराज देशमुख गांजे यांचे काल्याचे किर्तन होणार होणार आहे. त्यानंतर काल्याचा महाप्रसाद घेऊन पुन्हा परतीचा प्रवास सुरू होणार आहे. अशी माहिती दिंडी सोहळ्याचे अध्यक्ष, नारायण धनावडे, उपाध्यक्ष, दत्तात्रय खताळ बापू, सचिव, तुकारामजी देशमुख गांजे कार्याध्यक्ष, विठ्ठल सापते निझरे.खजिनदार अंजना भोसले, सचिन शेठ मगरे, विलास आबा पवार. व दिंडी सोहळ्यातील सर्व संचालक पदाधिकारी यांनी दिली. तसेच तालुक्यातीलच नव्हे तर सातारा जिल्ह्यातील सर्व भाविक या नामयज्ञ दिंडी सोहळ्यात मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आमदुरा येथील तरुण शेतकऱ्यांची आत्महत्या

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**



**दि.०९, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यांतील आमदुरा येथील तरुण शेतकरी कामाजी गुलाब पवार वय २३ वर्ष यांनी अतिवृष्टी व सततच्या नापिकीला कंटाळून स्वतःच्या राहत्या घरी दिनांक ०८ नोव्हेंबर २०२५ रोजी आत्महत्या केल्याची घटना घडली. याबाबत ओमकार गुलाब पवार यांनी मुदखेड पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पो.हे.का.एम.के.कदम हे करीत आहेत. अतिवृष्टी व नापिकी या बाबीला अनेक शेतकरी वैतागले असून शेतकऱ्यांनी आता टोकाचे पाऊल उचलण्यास प्रारंभ केला असल्याचे चित्र दिसून येत आहे. शासनाकडून शेतकऱ्यांना दिली जाणारी आर्थिक मदत ही तुटपुंजी असल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला असून शासनाने शेतकऱ्यांसाठी घोषित केलेले उर्वरित अनुदान जलद गतीने वाटप करावे. अशी मागणी शेतकरी वर्गातून केल्या जात आहे.

# आ.मुनगंटीवारांच्या पुढाकारातून कळमना येथे साकारले आधुनिक 'स्मार्ट' प्राथमिक आरोग्य केंद्र

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०९, बल्लारपूर (चंद्रपूर) :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे साकारलेला आणखी एक लोकहितकारी प्रकल्प आता जनतेच्या सेवेस सज्ज झाला आहे. आरोग्य सेवेच्या बळकटीकरणाला नेहमीच प्राधान्य देणारे आ. मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांतून बल्लारपूर तालुक्यातील कळमना येथे अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज अशा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या स्मार्ट इमारतीची उभारणी पूर्ण झाली आहे. ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत दर्जेदार व सुलभ आरोग्यसेवा पोहोचविण्याच्या त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण कार्याचा हा आणखी एक ठोस पुरावा आहे. या आरोग्य केंद्राचे उद्घाटन आ. मुनगंटीवार यांच्या हस्ते सोमवार, दिनांक १० नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ३



वाजता होणार आहे. नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा सहज उपलब्ध व्हाव्यात, याच एकमात्र हेतूने आ. सुधीर मुनगंटीवार यांनी जिल्ह्यात आरोग्य सेवेचे जाळे निर्माण केले. यात बल्लारपूर तालुक्यातील कळमना येथील स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्राच्या निमित्ताने नवा अध्याय जोडला जाणार आहे. अलीकडेच आ. मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून साकारलेले पोंभुर्णा तालुक्यातील उमरी पोतदार येथील भव्य प्राथमिक आरोग्य केंद्र संकुल आणि स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्र लोकांच्या सेवेत दाखल झाले. आणि आता कळमनावासीयांना देखील स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्राच्या निमित्ताने अद्ययावत आरोग्यसेवा मिळणार आहे. सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन आणि जिल्हा परिषद आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हा लोकार्पण सोहळा आयोजित करण्यात आला असून यावेळी अनेक मान्यवरांची उपस्थिती असेल. आपल्या भागात आ. मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे स्मार्ट आरोग्य केंद्र सुरू होत असल्याचा उत्साह स्थानिकांमध्ये आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांचीही या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थिती राहणार आहे.

### चंद्रपुरात आरोग्य सुविधांची क्रांती

उत्तम वैद्यकीय सुविधा मिळणे हा जनतेचा अधिकार आहे, असे मानून आ. सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूर जिल्ह्यात आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. अर्थमंत्री असताना त्यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांच्याकडून चंद्रपूर जिल्हा सामान्य रुग्णालयासाठी एमआरआय मशीनसाठी ७.५ कोटी रुपयांचा निधी आणला, १.५ कोटी रुपयांची मोबाईल कॅन्सर व्हॅन, जिल्ह्यात १३ नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र, ३२ स्मार्ट प्राथमिक आरोग्य केंद्र, ६ स्मार्ट रुग्णालय, मेडिकल कॉलेज, कॅन्सर हॉस्पिटल उभारणी करण्यासोबत नेत्र व आरोग्य शिबिरे राबवून हजारो नागरिकांना दिलासा दिला आहे. आरोग्यदायी चंद्रपूर हा त्यांचा संकल्प त्यांनी कायम प्रत्यक्षात उतरवून दाखवला आहे, हे विशेष.

## कृतज्ञता सोहळा भुगर येथे संपन्न होणार

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०९, विंचूर (नाशिक) :** भुगर नाशिक येथे प्रातिंक नामदेव शिंपी समाजन्नोती संस्था, नाशिक यांच्या वतीने समाजातील मान्यवर बांधवांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा शुक्रवार, दि. १४ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता तुळसा लॉन्स, मु.पो. भुगर, जि. नाशिक येथे पार पडणार आहे. या संस्थेच्या कार्यात तन-मन लावून योगदान देणाऱ्या तसेच दिवंगत समाज बांधवांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्याम माधवराव गनोरे, भुगर हे भूषवणार असून, स्वागताध्यक्ष म्हणून रवींद्र श्रीधर राहणे, भुगर यांची निवड करण्यात आली आहे. या प्रसंगी समाजातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार असून, संस्थेचे पदाधिकारी, विश्वस्त व सभासदांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कार्यक्रमानंतर स्नेह भोजनाची व्यवस्था करण्यात आली असल्याची माहिती नासिक प्रांतिक नामदेव शिंपी समाजोन्नती संस्था, नाशिक या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

## बच्चुभाऊंची भेट; शहापूर तालुक्यात प्रहारची रणनिती ठरली



**अक्षराज : अक्षय गिरा**

**दि.०८, शहापूर (ठाणे) :** मुंबईत प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष बच्चुभाऊ यांची शहापूर तालुका अध्यक्ष वसंत पानसरे यांनी भेट घेतली. या भेटीत होऊ घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सविस्तर चर्चा करण्यात आली.तालुक्यातून जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी किन्हवली, चेरपोली व मळेगाव या तीन गटांमधून उमेदवार उभे राहण्याची तयारी सुरू असल्याची माहिती वसंत पानसरे यांनी दिली. या प्रयत्नांना बच्चुभाऊ यांनी शुभेच्छा देत पक्ष संघटन अधिक बळकट करण्याचे मार्गदर्शन केले. या भेटी दरम्यान प्रहार पक्षाच्या आगामी रणनितीवरही चर्चा झाली असून, शहापूर तालुक्यात प्रहार पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविण्यासाठी विविध योजना राबविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. यावेळी संपर्क प्रमुख हितेश जाधव, ठाणे जिल्हा अध्यक्ष स्वप्नील पाटील तसेच भिवंडी, पालघर, ठाणे, नवी मुंबई व मुंबई येथील तालुका प्रमुख व पदाधिकारी उपस्थित होते.

# वृद्धेला मिळाला हक्काचा निवारा; निफाड प्रशासनाचा हृदयस्पर्शी उपक्रम

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०९, विंचूर (नाशिक) :** जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्या संकल्पनेतून व प्रांताधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे यांच्या मार्गदर्शनाखाली दिव्यांग, निराधार आणि असमर्थ नागरिकांना घरपोच धान्य वाटपाचा उपक्रम सुरू झाला आहे. मात्र, हा उपक्रम राबवत असतांना महसूल प्रशासनाला धोकादायक घरात राहणारी आज्जी दिसली, त्या आज्जीला तातडीने चांगल्या घरात हलवून प्रशासनाने अन्न दिनानिमित्त केवळ धान्य वाटप न करता अन्नाबरोबर मायेचा हात देण्याचा उपक्रम राबवला. या उपक्रमाचा एक भाग म्हणून निफाडचे तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी निफाड शहरातील कलावती भगरे या एकल वृद्ध लाभार्थीच्या घरी भेट दिली. त्या वेळी समोर उभे राहिलेले दृश्य अत्यंत हृदयस्पर्शी होते. भगरे आज्जी अत्यंत जिर्ण, पडझड झालेल्या घरात एकट्याच राहत होत्या. वृद्धापकाळ, आर्थिक अडचणी आणि असुरक्षित परिस्थिती यामुळे त्यांचे जीवन अत्यंत कठीण झाले होते. प्रशासनाचे प्रतिनिधी काही क्षण स्तब्धच राहिले. कर्तव्याबरोबरच मानवतेचा स्पर्श देत तहसीलदार नाईकवाडे यांनी धान्य देतानाच केवळ अन्नच नव्हे, तर वृद्धेच्या सुरक्षिततेचाही विचार केला. तत्काळ स्वस्त धान्य दुकानदारांच्या मदतीने भगरे आज्जींना त्या धोकादायक घरातून बाहेर काढून सुरक्षित भाड्याच्या खोलीत हलविण्यात आले. त्याचबरोबर आज्जींना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ नियमित मिळत असल्याची खात्री करून नगरपरिषदेला घरकुल योजनेतून मदतीचा प्रस्ताव पाठविण्याचे निर्देश दिले.

या संवेदनशील कृतीमुळे प्रशासनाचा दयाभाव आणि जबाबदारीची जाणीव ठळकपणे दिसून आली. निफाड प्रशासनाचा हा उपक्रम केवळ अन्न दिनापुरता



मर्यादित न राहता, माणुसकीचा खरा अर्थ समजावून देणारा ठरला आहे. यावेळी पुरवठा निरीक्षण अधिकारी अतुल गायकवाड, पुरवठा निरीक्षक उल्हास टर्ले तसेच स्वस्त धान्य दुकानदार हिंगमिरे उपस्थित होते.निफाड तालुक्यातील या उपक्रमाने समाजात प्रशासनाच्या संवेदनशीलतेचा एक नवा आदर्श निर्माण केला आहे.